संक्षिप्त फौजदारी ख. क्र. ११३७/२०१७
निशाणी क्र. १८/क लगत
सरकार वि. नयनराम.

<u>घटनास्थळ पंच</u>.

<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. ०१.</u>

मी शपथेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | : | दिपक शिवराम माळी |
| वय | : | ४१ वर्षे, |
| धंदा | : | हॉटेल |
| राहणार | : | वाघाडी, ता. शिरपूर, जि. धुळे. |

<u>सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. आर. ए. पाडवी यांचेकडूनः</u>

१. सदर केस बाबत मला माहीती आहे. सदर केस बाबत मला पोलीसांनी कधी बोलाविले ते आठवत नाही. घटनास्थळी अपघात झाल्याने त्याच्या पंचनाम्याबाबत बोलाविले होते. जे मी पाहिले होते ते मला आता आठवत नाही. पंचनाम्याकामी काय केले ते मला माहीत नाही. सदर घटनेस ७ ते ८ वर्ष झाल्याने ते मला आठवत नाही. पंचनाम्यावर मी काही केले नव्हते. पंचनाम्याबाबत मला काही आठवत नाही.

<u>साक्षीदार पुर्वीच्या जबाबाच्या विसंगत साक्ष देत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात ग्राहय असणारे सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली, परवानगी देण्यात आली.</u>

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०५.०९.२०१७ रोजी पोलीसांनी मला बोलाविले होते. हे मला आठवत नाही की, मला तेथे बोलाविल्यावर तेथे पंचनामा करण्यात आला. हे मला माहीत नाही माझ्यासोबत दुसरे पंच कोळी हे होते. मी येतांना इसार पेट्रोल पंप वाघाडी येथे थांबलो होतो. हे मला आठवत नाही की, त्यावेळेस मला अपघात झाला ते घटनास्थळ दाखविण्यात आले. हे मला आठवत नाही की, घटनास्थळाच्या चतुसिमा देखील मी पाहिल्या. आता मला घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर वाचून दाखवला, त्याबाबत मला काहीही माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा मला वाचून दाखवला व त्यावर माझी सही घेतली. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. हे म्हणणे खरे आहे की, त्यावरील सही माझी

POOJA NARAYAN KOKATE
Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2025.07.31 18:09:29 +0530

आहे. हे मला आठवत नाही की, घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर माझ्या समक्ष लिहिला होता व त्यावर माझी सही घेण्यात आली. घटनास्थळ पंचनाम्यावरील केवळ **सहीस निशाणी क्र. पी–१/पीडब्लू–१** देण्यात येत आहे.

**अभियोग पक्षातर्फे अभियोग पक्षाच्या साक्षीदाराची उलटतपासणी पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. आर. डी. देवरे यांनी नाकारला.**

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

POOJA NARAYAN KOKATE

Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2025.07.31 18:09:34 +0530

शिरपूर.
दिनांक ३१.०७.२०२५.

(श्रीमती पूजा ना. कोकाटे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.१),
शिरपूर, जि. धुळे.